# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. २०/०७/२००६

आज दि. २०/०७/२००६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दुपारी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०४ दि. १०/०७/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. जयाबाई यशवंत भोईर | सभापती, महिला बालकल्याण |
| ७) | श्रीम. संगिता विजय म्हात्रे | उप-सभापती, महिला बालकल्याण |
| ८) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सभापती, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती |
| ९) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| १०) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ११) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १२) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १३) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १४) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १५) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १६) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १७) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १८) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १९) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| २०) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २१) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २२) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २३) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २४) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २५) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २६) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २७) | श्री. नलावडे दिनेश दगडू | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ३ |
| २८) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| २९) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ३०) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| ३१) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३२) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३३) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ३४) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३५) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३६) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३७) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३८) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सभापती, क्रिडा व समाजकल्याण समिती |

| | | |
|---|---|---|
| ३९) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ४०) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ४१) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ४२) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ४३) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| ४४) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४५) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४६) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ४ |
| ४७) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ४८) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४९) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ५०) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सभापती, आरोग्य परिरक्षण समिती |
| ५१) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| ५२) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ५३) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ५४) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. १ |
| ५५) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ५६) | श्रीम. उर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ५७) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ५८) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ५९) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ६०) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ६१) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ६२) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ६३) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ६४) | श्री. चौहाण महेंद्रसिंग | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. २ |
| ६५) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ६६) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ६७) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ६८) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६९) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ७०) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ७१) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ७२) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ७३) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ७४) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ७५) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ७६) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ७७) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ७८) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ७९) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ८०) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य (सभापती, शिक्षण समिती) |
| ८१) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ८२) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ८३) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ८४) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

वरीलप्रमाणे महासभेकरिता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले. त्यानुसार वंदे मातरम् राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

(नगरसचिव यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. ४८ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. स्थायी समितीच्या एकुण १६ सदस्यांमधून माहे जुलै अखेर पुढील ८ सदस्य निवृत्त होत आहेत.

१) श्री. मोहन मधुकर पाटील
२) श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर
३) श्री. मिलन गोविंदराव पाटील
४) श्री. केशव रामभाऊ घरत
५) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील
६) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
७) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
८) श्री. गजानन लक्ष्मण भोईर

सदर सदस्यांच्या जागी नवीन सदस्यांची निवडणुकीद्वारे निवड करण्याकरिता दि. १५/०७/२००६ रोजी दुपारी ०३.०० ते सायं. ०५.०० या वेळेमध्ये नामनिर्देशन पत्र मागविले असता पुढील एकुण चौदा उमेदवारांनी आपली पंधरा नामनिर्देशन पत्र दाखल केलेली आहेत.

१) अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
२) अशोक बळवंत पाटील
३) गीता भरत जैन
४) चंद्रकांत भिकालाल मोदी
५) जेन्वी युस्टस आल्मेडा
६) नयना गजानन म्हात्रे
७) परशुराम पद्‌माकर म्हात्रे
८) माळी रविंद्र भिमदेव
९) मेंन्डोंसा स्टिवन जॉन
१०) रोहिदास शंकर पाटील
११) रांजणकर मुक्ता प्रविण
१२) शशिकांत जगन्नाथ भोईर
१३) संगिता कैलाश पाटील
१४) हंसु कमलकुमार पांडे

दि. १७/०७/२००६ रोजी प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी केली असता सर्व उमेदवारांची नामनिर्देशन पत्र वैध असल्याचे दिसून आलेले आहे. दि. १८/०७/२००६ रोजी आपली उमेदवारी मागे घेण्याच्या सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० या वेळेमध्ये कोणत्याही उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेतलेली नसल्याने आठ जागांकरिता एकुण १४ उमेदवार शिल्लक राहिलेले आहेत. करिता निवडणुक घेणे क्रमप्राप्त आहे. परंतु, प्रत्यक्ष निवडणुकीस सुरुवात होणेपुर्वी उमेदवारी मागे घेण्यास ठराविक वेळ देण्याची तरतुद अधिनियमामध्ये असल्याने मा. पिठासिन अधिकारी तसेच सभागृहाने किती वेळ द्यावा हे कृपया ठरवून तशी वेळ उमेदवारांस देण्यांत यावी. तद्‌नंतर प्रत्यक्ष मतदानास सुरुवात होईल.

**मा. महापौर :-**

ज्या सदस्यांना माघार घ्यायची असेल त्यांना दहा मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे.

**नगरसचिव :-**

ज्या उमेदवारांनी आपले अर्ज मागे घ्यायचे आहे त्यांना दहा मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे. आता १२.०० वाजले आहेत दु. १२.१० पर्यंतचा अवधी देण्यात येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, एकूण सदस्यांपैकी किती सदस्य गैरहजर आहेत किंवा सध्या सभागृहामध्ये किती सदस्य उपस्थित आहेत त्याची माहिती द्यावी.

**याकूब कुरेशी :-**

साहेब, मला असे वाटते दहा मिनिटांचा अवधी दिलेला आहे. दहा मिनिटानंतर नविन सभासदांची निवडणूक होईल.

**नगरसचिव :-**

निवडणूक प्रक्रिया चालू होईपर्यंत हजेरी चालू राहते. ही प्रक्रिया ज्यावेळी सुरू होईल त्यावेळी बाहेरील सदस्य येणार नाही. तोपर्यंत अजुनही सदस्य सभागृहात येऊ शकतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सध्या किती सदस्य उपस्थित आहेत? आता तुमच्याकडे त्याची नोंदणी आहे ना.

**मा. महापौर :-**

ज्या उमेदवारांनी माघार घेतलेली आहे त्यांचे अर्ज सचिवांनी वाचून दाखववे.

**नगरसचिव :-**

दिलेल्या वेळेत माघार घेतलेले अर्ज वाचून दाखवित आहे.

१) श्रीम. संगिता कैलास पाटील
२) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी
३) श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण
४) श्री. अशोक बळवंत पाटील

**मा. महापौर :-**

पाच मिनिटे शिल्लक आहेत. ज्या सदस्यांना माघार घ्यायची आहे. त्यांनी माघार घ्यावी. त्यानंतर पुढील प्रक्रियेसाठी लवकर सुरूवात होईल.

**याकूब कुरेशी :-**

सचिव साहेब मला वाटते दहा मिनिटे झाली आहेत.

**नगरसचिव :-**

दिलेला अवधी पुर्ण होत आहे. शिल्लक राहीलेल्या उमेदवारांची यादी मी वाचून दाखवत आहे.

१) अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
२) गीता भरत जैन
३) जेन्वी युस्टस आल्मेडा
४) नयना गजानन म्हात्रे
५) परशुराम पद्माकर म्हात्रे
६) माळी रविंद्र भिमदेव
७) मेंन्डोंसा स्टिवन जॉन
८) रोहिदास शंकर पाटील
९) शशिकांत जगन्नाथ भोईर
१०) हंसु कमलकुमार पांडे

चार सदस्यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतलेला आहे व दहा उमेदवार शिल्लक राहिल्याने निवडून येण्याकरिता आठ जागा आहेत त्यामुळे निवडणूक प्रक्रिया सुरू करावी लागेल. मतपत्रिका तयार करण्यास सुरूवात करत आहे. सदर मतपत्रिका तयार करण्यास एक तासाचा अवधी लागणार आहे.

(सन्मा. सभागृहाने मतपत्रिका बनविण्याकरिता एक तासाचा अवधी दिला.)

**नगरसचिव :-**

मतपत्रिका बनविण्यांत आलेली असून ती परत पुन्हा क्रमवार वाचून दाखवितो.

१) अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
२) गीता भरत जैन
३) जेन्वी युस्टस आल्मेडा
४) नयना गजानन म्हात्रे
५) परशुराम पद्माकर म्हात्रे
६) माळी रविंद्र भिमदेव
७) मेंन्डोंसा स्टिवन जॉन
८) रोहिदास शंकर पाटील
९) शशिकांत जगन्नाथ भोईर
१०) हंसु कमलकुमार पांडे

मतपत्रिकेवर सुचना आहेत. प्रत्येक सदस्यांस आठ मते आहेत. मत फुलीने जे आपण नेहमी फुली मारतो ती गुणाकार फुलीने असे दाखवायचे आहे. तुम्ही आपले मत कोणत्याही उमेदवारांस तुमच्या पसंतीप्रमाणे देऊ शकता. आठपेक्षा जास्त फुल्या करु नका. उमेदवाराच्या नावासमोर रकान्यात मताची खुण करावयाची आहे. मतपत्रिका खालील कारणाने रद्द होईल.

(१) सभासदाने मतपत्रिकेवर स्वाक्षरी केली किंवा ओळख पटेल असा शब्द लिहिला किंवा खुण केली तर. (२) मतपत्रिका स्थळविभागामधून फाडून घेण्यासाठी केलेल्या छिद्रांकित मर्यादित रेषेच्या दोन्ही बाजुस मुद्रेचा ठसा उमटविला नसेल तर. (३) मतपत्रिका मतनिर्देश खुण फुली नसेल किंवा ती संशयास्पद असेल तर. (४) मतपत्रिकेवर आठपेक्षा अधिक फुल्या मारल्या असतील तर मतपत्रिका रद्द होऊ शकते.

डायसवर दोन कक्ष केलेले आहेत. आमचे येथे तिन अधिकारी आहेत. एक अधिकारी नाव पुकारेल, दुसरा अधिकारी मतपत्रिका फाडून देईल. त्याच्यावर साईन करायची आहे आणि तिसरा अधिकारी मतपत्रिका

घडी करून देईल. समोर मतपेटी आहे आणि या दोन मतदान कक्षामध्ये लाल पेन्सिल ठेवलेल्या असून त्या लाल पेन्सिलनेच खुण करावयाची आहे. दुसऱ्या पेन्सिलने किंवा पेनाने खुण केल्यास ती मतपत्रिका बाद होईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, आता पक्षनिहाय संख्यावारी काय उपस्थित आहे? आपण आता लॉक केलेले आहे. आपण मतदानास सुरूवात केलेली आहे. सभागृहामध्ये कोणीही प्रवेश करणार नाही याची खात्री घ्यावी. सभागृहामधील एकूण सदस्यांपैकी किती सदस्य उपस्थित आहेत याची संख्या सांगावी आणि कोणी अनुपस्थितीचा अर्ज दिलेला असल्यास त्याची सभागृहाला माहिती द्यावी.

**नगरसचिव :-**

रजेचा एकही अर्ज माझ्याकडे आलेला नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एकूण सदस्यांपैकी किती सदस्य उपस्थित आहेत. सचिव साहेब, तुम्ही निर्णय द्या की, दार बंद झालेले आहे की नाही? तुम्ही मतदानास सुरूवात केली आणि आता सभागृहामध्ये अजूनही सदस्य येत आहेत.

**नगरसचिव :-**

अजून मतदानाला सुरूवात झालेली नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही तुमची सर्व प्रोसिजर सांगून मोकळे झाले होते.

**नगरसचिव :-**

मी त्या सुचना दिल्या आणि आता प्रोसिजर चालू होईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणून आता तरी विश्लेषण द्या.

**नगरसचिव :-**

सर्व दरवाजे बंद करा. कोणीही सदस्यांनी सभागृहाच्या बाहेर जाऊ नये. एकूण ७९ सदस्य आणि ५ नामनिर्देशित असे एकूण ८४ सदस्य उपस्थित आहेत.

**रिटा शाह :-**

सचिव साहेब, एक प्रश्न आहे. आता असे बोलले की, दरवाजा बंद करा. परंतु, तशी पद्धत नसते. तुमच्या इलेक्शनला उशीर झालेला आहे, ११.०० वाजताची वेळ होती आणि आता किती वाजले आहेत? ज्या नगरसेवकांनी मस्टरवर सही केलेली आहे. ते एवढा वेळ बसणार नाहीत, ते बाहेर जाऊन येणार आणि ते आल्यावर त्यांना मतदानाला नाही म्हणू शकत नाही. त्यांना आत घ्यावेच लागेल कारण त्यांनी मस्टरवर सही केलेली आहे.

**नगरसचिव :-**

आता सभागृहात जे सदस्य उपस्थित आहेत त्याप्रमाणे मतदान करायचे आहे. प्रत्येक प्रतिनिधींनी मतपेटी बघायची आहे. मतपेटी रिकामी आहे.

(सभागृहासमोर मतपेटी दाखविण्यात आली.)

**नगरसचिव :-**

मतपेटीची चावी मी मा. पिठासीन अधिकारी ह्यांच्याकडे सुपुर्द करतो.

(उपस्थित असलेल्या सन्मा. सदस्यांची नांवे पुकारुन प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेस सुरुवात करण्यांत आली.)

**नगरसचिव :-**

मतदानाची प्रक्रिया पुर्ण झालेली असून मतमोजणीस सुरुवात करण्यांत येत आहे.

(मतमोजणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली.)

**नगरसचिव :-**

मतमोजणीची प्रक्रिया पुर्ण झाली असून मा. महापौर तथा पिठासिन अधिकारी मतदानाचा निकाल घोषित करीत आहेत.

**मा. महापौर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका, सर्वसाधारण सभा दिनांक २०/०७/२००६, प्रकरण क्र. ४८, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम २०(५) च्या अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी नविन आठ सदस्यांची नेमणुक करणे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम (२०)३ अन्वये स्थायी समितीचे आठ सदस्य निवृत्त होणार आहेत. त्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत.

१) श्री. मोहन मधूकर पाटील

२) श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर

३) श्री. मिलन गोविंदराव पाटील

४) श्री. केशव रामभाऊ घरत
५) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील
६) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
७) श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र
८) श्री. गजानन लक्ष्मण भोईर

वरील निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या जागी नविन आठ सदस्यांची नेमणुक करावयाची आहे. त्याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम २०(५) अन्वये निश्चित केलेल्या तारखेस व वेळेत सदस्यांची नामनिर्देशन पत्रे मागविली असता एकुण १४ सदस्यांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती.

नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या तारखेस व वेळेस कोणीही सदस्यांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे न घेतल्यामुळे निवडणुक लढविणारे १४ सदस्य शिल्लक राहिले. परंतु निवडणुक प्रक्रियेस सुरुवात होणे अगोदर (१) श्री. अशोक बळवंत पाटील, (२) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी, (३) श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण, (४) श्रीम. संगिता कैलास पाटील या चार सदस्यांनी माघार घेतल्यामुळे दहा उमेदवार बाकी राहीले व स्थायी समिती सदस्य पदी आठ सदस्यांची निवड करावयाची असल्याने गुप्त पद्धतीने मतदान घेण्यांत आले. गुप्त पद्धतीने मतदान घेतले असता खालीलप्रमाणे प्रत्येक सदस्यास मते मिळाली. ती अशी (१) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी यांना ५६ मते मिळाली, (२) श्रीम. गिता भरत जैन यांना ६४ मते मिळाली, (३) श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा यांना ८८ मते मिळाली, (४) श्रीम. नयना गजानन म्हात्रे यांना १६ मते मिळाली, (५) श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे यांना ७२ मते मिळाली, (६) श्री. माळी रविंद्र भिमदेव यांना ६८ मते मिळाली, (७) श्री. मेंन्डोंसा स्टिवन जॉन यांना ७२ मते मिळाली, (८) श्री. रोहिदास शंकर पाटील यांना ७२ मते मिळाली, (९) श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर यांना ६० मते मिळाली, (१०) श्री. हंसु कमलकुमार पांडे यांना ६४ मते मिळाली

वरीलपैकी ज्या सन्मा. सदस्यांना जास्त मते मिळाली आहेत त्या आठ उमेदवारांची नांवे अशी आहेत.

१) श्रीम. गीता भरत जैन
२) श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा
३) श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे
४) श्री. माळी रविंद्र भिमदेव
५) श्री. मेंन्डोंसा स्टिवन जॉन
६) श्री. रोहिदास शंकर पाटील
७) श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर
८) श्री. हंसु कमलकुमार पांडे

याप्रमाणे स्थायी समिती सदस्य पदावर आठ सदस्य बहुमताने निवडुन आल्याचे मी घोषित करीत आहे. धन्यवाद.

**प्रकरण क्र. ४८ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम २०(५) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (०८) सदस्यांच्या जागी नवीन (आठ) सदस्यांची नेमणुक करणे.

**ठराव क्र. ३८ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम (२०)३ अन्वये स्थायी समितीचे आठ सदस्य निवृत्त होणार आहेत. त्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत.

१) श्री. मोहन मधूकर पाटील
२) श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर
३) श्री. मिलन गोविंदराव पाटील
४) श्री. केशव रामभाऊ घरत
५) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील
६) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
७) श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र
८) श्री. गजानन लक्ष्मण भोईर

वरील निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या जागी नविन आठ सदस्यांची नेमणुक करावयाची आहे. त्याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम २०(५) अन्वये निश्चित केलेल्या तारखेस व वेळेत सदस्यांची नामनिर्देशन पत्रे मागविली असता एकुण १६ सदस्यांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती.

नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या तारखेस व वेळेस कोणीही सदस्यांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे न घेतल्यामुळे निवडणुक लढविणारे १४ सदस्य शिल्लक राहिले. परंतु निवडणुक प्रक्रियेस सुरुवात होणे अगोदर

(१) श्री. अशोक बळवंत पाटील, (२) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी, (३) श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण, (४) श्रीम. संगिता कैलाश पाटील या चार सदस्यांनी माघार घेतल्यामुळे दहा उमेदवार बाकी राहीले व स्थायी समिती सदस्य पदी आठ सदस्यांची निवड करावयाची असल्याने गुप्त पद्धतीने मतदान घेण्यांत आले. गुप्त पद्धतीने मतदान घेतले असता खालीलप्रमाणे प्रत्येक सदस्यास मते मिळाली.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | मिळालेली मते |
|---|---|---|
| १ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | ५६ |
| २ | गीता भरत जैन | ६४ |
| ३ | जेन्वी युस्टस आल्मेडा | ८८ |
| ४ | नयना गजानन म्हात्रे | १६ |
| ५ | परशुराम पद्माकर म्हात्रे | ७२ |
| ६ | माळी रविंद्र भिमदेव | ६८ |
| ७ | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | ७२ |
| ८ | रोहिदास शंकर पाटील | ७२ |
| ९ | शशिकांत जगन्नाथ भोईर | ६० |
| १० | हंसु कमलकुमार पांडे | ६४ |

वरीलपैकी ज्या उमेदवारांना जास्त मते मिळाली आहेत त्या आठ उमेदवारांची नावे अशी आहेत :-

१) श्रीम. गीता भरत जैन
२) श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा
३) श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे
४) श्री. माळी रविंद्र भिमदेव
५) श्री. मेंन्डोंसा स्टिवन जॉन
६) श्री. रोहिदास शंकर पाटील
७) श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर
८) श्री. हंसु कमलकुमार पांडे

याप्रमाणे स्थायी समिती सदस्य पदावर ०८ (आठ) सदस्य बहुमताने निवडून आल्याचे मी घोषीत करीत आहे.

**सही/-**
**पिठासिन अधिकारी / महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४९ चे वाचन केले.)

(सन्मा. सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ४९ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानूमते मंजुर.

**धनराज अग्रवाल :-**

ठराव सर्वानूमते मंजुर कसा बोलता? तुम्ही नामनिर्देशन दिले आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही नामनिर्देशन दिले तुमच्या अधिकारात ठराव कसा होईल? ठराव कशाचा मंजुर करता तुम्ही? आपण पिठासिन अधिकारी म्हणून बसला आहात. तुम्ही सांगा ना कशाचा ठराव मांडला?

**नगरसचिव :-**

वृक्षप्राधिकरण सदस्यांचा.

**मा. महापौर :-**

वृक्षप्राधिकरण समितीची जी नामनिर्देशित नावे वाचून दाखवली ती बहूमताने मंजुर झाली.

**रोहीदास पाटील :-**

तुमच्या अधिकारात ती घोषित केली असे बोला ना.

**प्रकरण क्र. ४९ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदरस्य पदासाठी नियुक्ती करणे.

**ठराव क्र. ३९ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे (संरक्षण व जतन) (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये १२ सदस्य व ३(३) अन्वये ०३ नामनिर्देशित सदस्य खालीलप्रमाणे एकूण १५ सदस्यांची नियुक्ती ही सर्वसाधारण सभा करीत आहे.

**वृक्षप्राधिकरण समिती सदस्य**

१) श्री. आयुक्त सो. - अध्यक्ष
२) श्री. महेंद्रसिंग चौहाण
३) श्री. टेरी पॉल परेरा
४) श्री. आत्माराम बाळाराम गावंड
५) श्रीम. उर्मिला कोमल भामरे
६) श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे
७) श्रीम. शुभांगी सिताराम नाईक
८) श्री. शफिक अहमद खान
९) श्रीम. रिटा सुभाष शाह
१०) श्रीम. सुनिता कैलास पाटील
११) श्री. सुरेंद्रप्रसाद मुरलीधर तिवारी
१२) श्रीम. जिवी हिरा वाडे

**नामनिर्देशित सदस्य**

१) श्री. भगवती शर्मा
२) श्री. बळीराम भोसले
३) श्री. जवाहरभाई सोमचंद शहा

वरील समितीवरील सदस्यांची मुदत एक वर्ष राहील व याबाबतची पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने, स्थायी समिती सदस्य पदावर तसेच वृक्षप्राधिकरण सदस्य पदावर निवडून आलेल्या सदस्यांचा मा. महापौरांच्या हस्ते सत्कार करण्यात येत आहे.

(मा. महापौरांनी निवडून आलेल्या सर्व स्थायी समिती व वृक्षप्राधिकरण समिती सदस्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.)

**मोहन पाटील :-**

मुंबईसह भाईंदरमध्ये दि. ११ जुलै रोजी रेल्वे बॉम्बस्फोटामध्ये जी जिवीतहानी झाली. त्याबद्दल सर्वांना भावपुर्ण श्रद्धांजली वाहण्याकरिता याठिकाणी मी शोकप्रस्ताव ठेवत आहे.

**याकुब कुरेशी :-**

माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

त्याचबरोबर गोरख बा. मेढेकर ह्यांचे हृदयविकाराने मंगळवारी निधन झाले त्याबद्दल मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**संजय पांगे :-**

त्याचबरोबर नितीन कोठारी यांचे अल्प आजाराने निधन झाले त्याचासुद्धा मी ठराव मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

त्याचप्रमाणे खासदार वसंतरावजी चव्हाण साहेब ह्यांचेदेखिल निधन झाले त्याबद्दल ही सभा शोक व्यक्त करित आहे.

**दुःखवटा ठराव क्र. ३९(अ) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये मुंबईसह भाईंदरमध्ये दि. ११ जुलै रोजी रेल्वे बॉम्बस्फोटामध्ये जी जिवितहानी झाली तसेच मिरा भाईंदर महापालिका हद्दीतील श्री. गोरख बा. मेढेकर, श्री. नितीन मेढेकर व

त्याचप्रमाणे खासदार श्री. वसंतरावजी चव्हाण यांचे निधन झाले. सर्व मृतात्म्यांना शांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन त्यांच्या कुटूबियांच्या दुःखात ही महासभा सहभागी आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. याकुब कुरेशी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

सर्वांनी जागेवर दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली द्यायची आहे.

**मा. महापौर :-**

सभेस उपस्थित असलेले मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. विरोधी पक्ष नेते, मा. सभागृह नेते, मा. नगरसचिव, सर्व नगरसेवक-नगरसेविका, अधिकारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून सभा संपल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०३.१० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**